राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -१८०/२०१८/सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी |
|---|---|
| श्री. गणेश रंगनाथ दातार | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, रोहयो सोलापूर यांचे कार्यालय, सोलापूर |

(निर्णय दिनांक- २०/०२/२०२५)

तक्रारदार यांनी दिनांक ३०/११/२०१८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारदार यांनी, 'जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, सोलापूर यांनी माहिती अधिकारातील माहिती देण्यासाठी पोस्ट खर्च जास्त घेण्यात आलेली रक्कम आज अखेर परत देण्यात आलेली नाही', अशी तक्रार आयोगाकडे केलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ मधील तरतुदीमध्ये तक्रार प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष सुनावणी घेण्यासंदर्भात कोणतीही स्पष्ट तरतूद नमूद केलेली नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ७ (३) (क), (ख) व महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक आरटीआय २००५/ सी. आर. ३१५/०५/५ सामान्य प्रशासन मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ११ ऑक्टोबर २००५ अन्वये माहिती अर्जास अनुसरुन शुल्क कळविण्यासंदर्भात सविस्तर निर्देश दिले आहेत.

उपलब्ध अभिलेखावरून प्रत्यक्ष पोस्टेज शुल्का पेक्षा अधिक आकारणी झाल्याचे दिसून येते. तरी जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, रोहयो सोलापूर यांनी तक्रारदार यांच्या ज्यादा पोस्ट खर्च आकारणी संदर्भातील तक्रारीच्या अनुषंगाने १५ दिवसात कार्यवाही करून तसे तक्रारदार यांना कळविण्यात यावे या निर्देशासह सदर तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक -१८०/२०१८/सातारा / 73 85/2025

दिनांक - 6/3/2025